N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): चंद्रपुर **P.S.**(ठाणे): भद्रावती **Year** (वर्ष): 2026

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0703

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 28/07/2026 02:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार
   **Time Period** (कालावधी): पहर 5
   **Date From** (दिनांक पासून): 27/07/2026
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 27/07/2026
   **Time From** (वेळेपासून): 12:16 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 13:45 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 27/07/2026 **Time** (वेळ): 16:04 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 011
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 28/07/2026 02:07 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 02 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): वनक्षेत्र सहायक कार्यालय , समोर , वनपरिक्षेत्र कार्यालय ,परिसर भद्रावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भारत वसंत बोढेकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2003

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मांगली पोश्टपिरली ,भद्रावती ,भद्रावती,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मांगली पो पिरली ,भद्रावती ,भद्रावती,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9518947868

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वनक्षेत्र साहाय्यक कोमल नरसिंगराव घुगलोत | | | 1. सरकार नगर ◌ग्रवाल कोचीग, क्लॉंसेस जवळ चंद्रपुर,भद्रावती, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वनरक्षक संदीप पुंडलिक पारवे | | | 1. एसटीपीएफ कॉलनी मुल रोड , चंद्रपुर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |
| 3 | ललीत दिलीप नागपुरे | | | 1. झिंगुजी वार्ड भद्रावती,भद्रावती , भद्रावती,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | सॅमसॅग कंपनीचा एक जुना वापरता मोबाईल | 12,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | विवो कंपनीचा एक जुना वापरता मोबाईल | 15,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | सॅमसॅग कंपनीचा एक जुना वापरता मोबाईल | 14,000.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | किरकोळ कागदपत्र | वन गुन्हा क्र 3/26 प्रतिवत्ताची छायांकित प्रत | 0.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/रूपये (ज्यात 500/ रू दरांच्या 20 चलनी नोटा 10,000/ रू व लहान मुलांचे खेळण्यातील नक्कली 500 | 10,000.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | एक गळद हिरव्या रंगाचा लोव्हर पॅन्ट | 0.00 |
| 7 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | पडताळणी व सापा कार्यवाहीचे 32 जीबी क्षमतेचे सॅडीस कंपनीचे 01 मेमोरी कार्ड | 0.00 |
| 8 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | सापळा कार्यवाही दरम्यान लाच रक्कम जप्तीचे व अंगझडतीचे व्हिडीओ चित्रीकरणाचे मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

51,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

यातील आलोसे क्र. 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वय 42 वर्षे, पद-वनक्षेत्र सहायक, (वर्ग-3), आलोसे क्र. 2) संदीप पुंडलिक पारवे वय 39 वर्षे, पद-वनरक्षक (वर्ग-3), दोन्ही वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती यांनी तक्रारदाराचे टॅक्टर ट्रालीवर अवैध्यरित्या रेती भरून वाहतुक केल्याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे पाठविण्याचे कामाकरीता 20,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून आरोपी क्र. 3) श्री. ललीत दिलीप नागपूरे वय 19 वर्षे धंदा मजूरी रा. झिंगुजी वार्ड, भद्रावती (खाजगी इसम) यांचे मार्फतीने स्विकारल्याने आरोपीतांविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, (सुधारणा 2018) कलम 7, 7 अ,12 अन्वये कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद
पोलीस ठाणे, भद्रावती जि.चंद्रपूर
दिनांक 27/07/2026

माझे नाव अनिल मोहनरेड्डी जिड्डावार, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर, मो.क्र. 9823270581

समक्ष पोलीस ठाणे भद्रावती, जि. चंद्रपूर येथे हजर होउन फिर्याद लिहुन देतो की, मी माहे मे/2026 पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.
दिनांक 23/07/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना वेळ 13/00 वा. दरम्यान एक इसम आमचे कार्यालयीन कक्षात आला व त्यांनी आपला परिचय श्री. भारत वसंता बोढेकर, वय 23वर्षे, धंदा-शेती, रा.मांगली, पो.पिरली, ता.भद्रावती, जि.चंद्रपूर असे सांगुन त्यांनी आम्हास लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्याचे सांगितल्याने त्यांना सुचीत केलेवरून त्यांनी हस्तलिखीत तक्रार सादर केली.
सदर तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजीत करण्यासाठी आमचे कार्यालयातील पोशि/महेश माहुरपवार यांचे हस्ते मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर यांना पत्र देवून दोन शासकीय पंच नामे श्री. युवराज जिवन बिरीया, वय 44 वर्षे, पद- कनिष्ठ लिपीक, व श्री. महेश कवडू काकडे, वय 42 वर्षे, पद- उपलेखापाल, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर यांना उपलब्ध करून घेतले.
त्यांनतर दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. भारत वसंता बोढेकर, यांनी एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने दिलेल्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करून कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती विचारली असता दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविल्याने त्यांचे संमतीपत्र घेण्यात आले. त्यावरून पंच क्र. 1) श्री युवराज जिवन बिरीया, कनिष्ठ लिपीक व पंच क्र. 2) श्री महेश कवडू काकडे, उपलेखापाल हे काम पाहणार असल्याचे ठरविण्यात आले.
सापळा पार्टीतील सदस्य पोनि प्रशांत केदार, पोहवा/विजेंद्र वाढई, पोहवा/रविकांत इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/महेश माहुरपवार, पोशि/सचिन गजभिये, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/अमोल सिडाम, पोशि/राकेश जांभुळकर, मपोशि/मेघा मोहुर्ले, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि/संदीप कवरासे मो.प.वि.चंद्रपूर तसेच तक्रारदार यांचा नमूद दोन्ही पंचांना परिचय करून देवून तक्रारदार श्री. भारत वसंता बोढेकर यांचीच लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगण्यात आले.
त्यांनतर आम्ही, तक्रारदार श्री. भारत वसंता बोढेकर यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबधी तोंडी विचारपूस केली असून तक्रारदाराची तक्रार खालीलप्रमाणे आहे.
''माझे नाव :- श्री. भारत वसंता बोढेकर, वय 23 वर्षे, धंदा- शेती, रा. मांगली, पो. पिरली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. मो. क्र. 9518947868
''सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी माझे आई-वडिलांसह वरील पत्यावर राहत असून वडिलांचे नावाने असलेल्या शेतात कामे करतो. माहे जून/2026 मध्ये शेतीचे कामाकरिता माझे वडिलांचे नावाने महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टरचा मुंडा खरेदी केले होते, त्याची पासींग होणे बाकी आहे. तसेच माझे नावाने टॅक्टर ट्रॉली क्र. एमएच 34 सीजे 6838 आधीपासूनच होती.
दिनांक 7/7/2026रोजी रात्री 11/45 वा. दरम्यान मी, चालक नामे सुनिल कोवे, रा. मांगली व मजुर अमिर बदकी, रा. मांगली असे माझे ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये रेती भरून माझे घराचे दुरूस्ती कामाकरिता ट्रॅक्टर माझे घरी घेऊन येत होतो. त्यावेळेस मानोरा तांडा, रोडवर दोन इसमांनी माझे ट्रॅक्टर थांबवून श्री कोमल घुगलोत (वनपाल) व श्री संदीप पारवे (वनरक्षक), वनपरिक्षेत्र कार्यालय भद्रावती, जि. चंद्रपूर असा परिचय देऊन मला, ''ट्रॅक्टरने रेती कुठे घेऊन जात आहे?'' असे विचारणा केले. तर मी त्यांना घराचे दुरूस्तीचे कामाकरिता रेती घेऊन जात असल्याचे सांगितले. परंतु त्यांनी माझे काहीही न ऐकता श्री. संदीप पारवे हे माझे ट्रॅक्टरवर बसून माझे ट्रॅक्टर ट्रॉलीसह वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती येथे घेऊन गेले व मला गाडीचे कागदपत्र घेऊन येण्यास सांगीतले होते.
त्यानंतर दुसरे दिवशी दिनांक 8/7/2026 रोजी गैरअर्जदार श्री. संदीप पारवे (वनरक्षक) यांनी त्यांचे मो. क्र. 9049440081 वरून माझे मो.क्र. 9518947868 वर फोन करून तुमच्या गाडीवर कार्यवाही केली असल्याचे सांगुन गाडीचे कागदपत्र सोबत घेऊन वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती येथे बोलाविले. तेव्हा मी त्यांना, ''माझी ट्रॅक्टरची पासिंग व्हायची आहे, कागदपत्र नाही.'' असे सांगितले होते. तसेच त्यानंतर आम्ही एकमेकांना दोन-तीनदा फोन केला असून, माझी ट्रॅक्टर सोडून देण्यास फोनवर विनंती केली तर त्यांनी मला,''ट्रॅक्टर सोडायचा असेल तर पैसे द्यावे लागतील.'' असे म्हणाले.
दिनांक 17/7/2026रोजी दुपारी 12/30 वा. दरम्यान मी माझे ट्रॅक्टरबाबत विचारणा करण्याकरिता वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती येथे जावून वनक्षेत्र सहायक श्री. कोमल घुगलोत यांची भेट घेतली असता त्यांनी, माझे ट्रॅक्टर ट्रॉलीवर अवैधरीत्या रेती भरून वाहतूक केल्याची कार्यवाही केलेली असून कारवाईचे कागदपत्र रेंज

अॉफीस (वनपरिक्षेत्र कार्यालय) येथे पाठविण्यासाठी माझे व वनरक्षक पारवे यांस मिळून 30,000/- रूपये देण्यास सांगीतल्याने मी त्यांना, माझ्याकडे एवढे पैसे नाही म्हणून म्हटले. तर त्यांनी, ''20,000/- रूपये आणून दिले नाही तर तुझी ट्रॅक्टर फॉरेस्ट केसमध्ये सडवून टाकणार'' असे म्हणाल्याने मी घाबरून जावून नाइलाजास्तव होकार दिला. तेव्हा त्यांनी आम्ही आमचे कार्यक्षेत्रात कामानिमीत्य राऊंडवर जात असल्याने तु आम्ही दोघेही कार्यालयात हजर असतांनाच ये, तेव्हा तुझे काम होईल असे म्हणाले. त्यानंतर मी तिथून निघून गेलो. मला घरगुती व शेतीचे कामे असल्याने मी तक्रार देण्यास आलो नाही.
मला श्री कोमल घुगलोत (वनक्षेत्र सहायक) व श्री संदीप पारवे (वनरक्षक), वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती, जि. चंद्रपूर यांना 20000/- रूपये लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी आज दिनांक 23/7/2026रोजी 13/00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे प्रत्यक्ष हजर राहून आपणास वरीलप्रमाणे हकीकत सांगून लाच मागणीबाबत तक्रार अर्ज देत आहे.
गैरअर्जदार श्री कोमल घुगलोत (वनक्षेत्र सहायक) व श्री संदीप पारवे (वनरक्षक), वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती, जि. चंद्रपूर यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसून त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. माझे वैयक्तिक बचतीतील 10,000/- रूपयांचे नगदी नोटा व उर्वरीत रक्कम माझेकडे जुळत नसल्याने आपले सुचनेनुसार लहान मुलांचे खेळणीतील 10,000/- रूपयांच्या नकली नोटा बाजारातून खरेदी करून असे एकुण 20,000/- रूपये लाच रक्कम म्हणून वापरण्याकरिता देत आहे.
तरी माझे ट्रॅक्टर ट्रॉलीवर अवैधरित्या रेती भरून वाहतुक केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईचे कागदपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे पाठविण्याचे कामाकरिता गैरअर्जदार श्री कोमल घुगलोत (वनक्षेत्र सहायक) व श्री संदीप पारवे (वनरक्षक) यांनी मिळून 20,000/- रूपयांची लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरूद्ध कारवाइ होणेस विनंती आहे.''
अशाप्रकारे तक्रारदाराने दिलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही तक्रारीवर सही केली. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीबाबत  टॅ्रक्टर खरेदीची शोरूम प्रत व ट्राली क्र. MH 34 CJ 6838 ची आर.सी. प्रत इत्यादी छायान्कीत कागदपत्र आमचेकडे दिल्याने आम्ही, पंचानी व तक्रारदाराने सहया केल्यावर ते कागदपत्रात समाविष्ट केले. त्यानंतर तक्रारदार यांचेकडील लाचेत वापरण्यात येणारे 10,000/- रूपयांचे चलनी नोटांचे तसेच लहान मुलांच्या खेळणीतील 10,000/- नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी सहया केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतली. त्यावरून तक्रारदार यांनी 500/- रू दरांच्या 20 नोटा असे एकुण 10,000/- रूपयांच्या नगदी नोटा सादर केले त्या नोटांचे क्रमांक पुढील प्रमाणे आहेत.

500/- रू दरांच्या 20 नगदी नोटा
7QW 295421 7QW 295420 7QW 295422 7QW 295423 5VW 327680 9KT 690757
6QH 692281 6WV 593735 4SD 246199 1CW 550970 2KU 909939 5BN 550411
5VW 327681 3RP 404613 1DP 861468 4RK 531660
0RK 664217 5RV 439561 7VM 438445 5VW 327682

तसेच उर्वरीत 10,000/- रू. रक्कम तक्रारदार श्री भारत बोढेकर यांचेकडे जुळत नसल्याने आमचे सुचनेनुसार लहान मुलांचे खेळण्यातील नक्कली 500 चे 20 नोटा एकुण 10,000/- बाजारातुन खरेदी करून आमचेकडे जमा केले आहे.

500/- रू दरांच्या 20 लहान मुलांच्या खेळणीतील नक्कली नोटा
2NK 986111

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाऱ्या अँथ्रॅासीन पावडर व अल्ट्राव्हॅायलेट दिव्याचा उपयोगाबाबत माहीती देवून अॅथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॅायलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला निळसर रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत पोहवा/विजेंद्र वाढइ यांचे हस्ते प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्यानंतर पोहवा/विजेंद्र वाढइ यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले. तसेच आमचे कार्यालयीन डिजीटल व्हॅाइस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे

काम करण्याची पध्दतीबाबत पोशि/प्रदीप ताडाम यांचे मार्फतीने माहिती देण्यात आली असून याबाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आलेली आहे.
त्यानंतर तक्रारदाराने तक्रारीत सांगितल्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी तक्रारदारास ते दोघेही वनक्षेत्र सहायक कार्यालय भ्रदावती येथे हजर असल्याची शहानिशा करूनच भेट घेण्यास सांगितले असल्याचे सांगितले असल्याने पुढील पडताळणी/सापळा कार्यवाही ही दोन्ही गैरअर्जदार हे त्यांचे कार्यालयात हजर असल्याची तक्रारदार यांचेकडून माहीती घेवून करण्यात येणर असल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले व सदर तक्रारीच्या गोपनियतेबाबत सर्वांना सुचना देण्यात आले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर नोंदी प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आल्या).
त्यानंतर दिनांक 27/7/2026 रोजी तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री कोमल घुगलोत, वनक्षेत्र सहायक व श्री संदीप पारवे वनरक्षक, हे त्यांचे वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती येथे हजर असल्याची माहीती प्राप्त झाली असल्याचे आम्हास कळविल्याने आम्ही त्यास भद्रावती शहर परिसरातील निर्जन स्थळी हजर राहण्याबाबत सुचना देवून लाच मागणी पडताळणी/सापळा कार्यवाही संबंधाने ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टॉर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, दि. 23/7/2026 रोजीचे प्रात्यक्षिक कार्यवाहीचे मेमरीकार्ड व नविन मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रकमेचा लिफाफा, लाच रक्कमेचे क्र. असलेले जप्तीपत्रक व लेबल फार्मट असलेली प्रिन्ट व स्टेशनरी साहीत्य बरोबर ठेवुन असल्याची खात्री केली. शासकिय लॅपटॉप, लॅपटॉपचे चार्जर, प्रिन्टर, इत्यादी साहित्य त्यांचे जोडणीसह सोबत घेतले. त्यांनतर आम्ही, सोबत दोन्ही पंच, पोशि प्रदीप ताडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, पोशि/महेश माहुरपवार व चापोशि संदीप कवरासे असे शासकिय वाहन क्र MH 34 CJ 1533 या वाहनाने तसेच पोनि प्रशांत केदार, पोहवा/हिवराज नेवारे,पोशि/सचिन गजभिये, मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतीश सिडाम असे शासकिय वाहन क्र. MH 34 8788 मध्ये बसून वेळ 11/20 वा. ला.प्र.वि. चंद्रपूर येथून रवाना होवून भद्रावती शहर परिसरात तक्रारदार थांबून असलेल्या निर्जन स्थळी 12/00 वा. दरम्यान पोहचलो. त्यांनतर तक्रारदाराचे तक्रारीबाबत सर्वांना थोडक्यात सांगून तक्रारदार व पंच तसेच सापळा पथकास पडताळणी कार्यवाहीबाबतच्या सुचना दिल्या.
त्यानंतर लाचेची मागणीबाबत पडताळणी करणे असल्याने पडताळणी कार्यवाही अनुषंगाने पंच क्र 1 यांचे हस्ते तक्रारदाराची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र. 01 यांना गैरअर्जदारांची प्रत्यक्ष भेट घेवून सत्यता पडताळणी करण्याकरीता पाठवितांना पडताळणी कार्यवाहीबाबत तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सविस्तर सुचना दिल्या.
सदर पडताळणी कार्यवाहीकरीता आमचे सुचनेवरुन पोशि/प्रदीप ताडाम यांनी SanDisk कंपनिचे 32GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV541238 असे प्रिंट असलेले प्रात्यक्षिक कार्यवाहीचे नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर वेळ 12/16 वा. रेकॉर्डीग सुरू करून पंच क्रं. 01 यांचे आवाजात तक्रारदार यांचेसह लाच रक्कमेच्या पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबत प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 12/18 वा. तक्रारदाराचे काळ्या रंगाची हिरो स्पेंडर मो.सा. क्र. MH 34 C 7116 नी रवाना केले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. 2 यांचेसह भद्रावती परिसरातील निर्जन स्थळी थांबून राहीलो
त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र. 1 यांचेसह थांबून असलेल्या ठिकाणी परत आल्यावर आमचे सुचनेवरून पोशि/प्रदीप ताडाम यांनी तक्रारदाराचे गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून पंच क्र.1 यांच्या आवाजात वेळ 13/02 वा. बंद केले. त्यांनतर पंच क्र. 1 यांचे कडुन तक्रारदाराची पडताळणी नंतरची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.
त्यानंतर पंच क्र. 1 यांना घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, ''तक्रारदारासह त्यांचे मो.सा. ने गैरअर्जदार यांचे कार्यालयात जावून तिथे डोकावून पाहीले असता गैरअर्जदार हे दिसून न आल्याने तक्रारदाराने गै.अ. घुगलोत यांचे मोबाईलवर फोन लावून फोन स्पिकर मोडवर ठेवून बोलणी केली असता गै.अ. घुगलोत यांनी कार्यक्रमासाठी गेल्याचे सांगून पंधरा-वीस मिनीटांनी येणार असल्याचे सांगितल्याने आम्ही तिथेच थांबून राहीलो. काही वेळाने गै.अ. घुगलोत हे हजर आल्याने तक्रारदाराने मला इशाऱ्याने सांगितले. त्यांनतर तक्रारदारासह त्यांचे कार्यालयातील कक्षात गेलो तेव्हा तक्रारदाराने आपले कामाबाबत बोलणी केली तेव्हा गै.अ. घुगलोत यांनी आतापर्यत कागदपत्र दिले नसल्याचे सांगितले वरून तक्रारदाराने गै.अ. पारवे यांचेकडे कागदपत्र दिले असल्याचे सांगितले. त्यांनतर गै.अ. घुगलोत यांनी तक्रारदारास माझेकडे उजव्या हाताने बाहेर जाण्याचा इशारा

केल्याने तक्रारदाराने मला भाऊ थोड बाहेर थांबा असे म्हटल्याने मी कार्यालयाचे समोरील रूममध्ये येवून थांबलो. काही वेळाने तक्रारदार हे मी थांबून असलेल्या रूममध्ये आले तेव्हा त्याठिकाणी गै.अ. पारवे दिसल्याने त्यांनी मला डोळयांनी व डोके हलवून इशारा करून दाखवून तक्रारदाराने गै.अ. पारवे यांना गै.अ. घुगलोत यांनी तुम्हाला भेटण्यास सांगितले असे बोलल्यांनतर गै.अ. पारवे हे गै.अ. घुगलोत यांचे कक्षात गेले व तक्रारदार यांना सुध्दा बोलावून घेतले त्यांनतर त्यांचेत बोलणी होवून तक्रारदार हे मी थांबून असलेल्या रूममध्ये गै.अ. पारवे यांचेसोबत परत आले तेव्हा तक्रारदाराने गै.अ. पारवे याला दहा-पंधरा मिनीट थांबण्यास सांगितले त्यांनतर आम्ही आपण थांबून असलेल्या ठिकाणी परत आलो'' असे सांगितले. त्यावरून तक्रारदार यांना त्यांचे व गैरअर्जदार यांचे झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता तक्रारदार याने ''पंच क्र. 1 यांनी वरील सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. व तक्रारदाराने सांगितले की ''पहिल्यांदा गै.अ. घुगलोत यांचे कक्षात असतांना पंच हे बाहेर गेल्यानंतर गै.अ. घुगलोत यांना कामाबाबत बोलणी करून त्यांना काही कमी नाही होणार पैसे असे म्हटले तर त्यांनी ''नाही बोहोतच कमी केले, तुले सांगीतले तेवढे, किमी कमी करू बे अजून, थोड फार कमी करून, तुझ्याकडे पाहून एवढ केल, चाळीस वरून, तीस वरून डायरेक्ट वीस वर आणलं तरी, त्याच्यातून कमी कर म्हणत आहे साल, वीस देवून दे जा'' असे म्हणुन गै.अ. पारवे यांना भेटण्यास सांगितले. त्यामुळे मी पंच थांबून असलेल्या रूममध्ये परत आलो त्यादरम्यान गै.अ. पारवे हे तिथे आले त्यांनतर दुसऱ्यादा परत गै.अ. घुगलोत यांचे कक्षात गेल्यावर बोलणी झाल्यानंतर गै.अ. पारवे यांनी मला ''पैसे घेवून ये, किती आणते'' असे म्हणुन विचारले तर वीस हजार रूपये सांगितले तर त्यांनी ''जा घेवून ये लवकर'' असे म्हटल्याने त्यांना दहा पंधरा मिनीट थांबण्यास सांगून पंचासह थांबलेल्या ठिकाणी परत आलो'' असल्याचे सांगितले.

सदर संभाषण व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मध्ये FOLDER मधील फाईल क्र 260727_1216 मध्ये रेकॉर्ड झाले असून सदर संभाषण शासकीय लॅपटॉपमध्ये कॉपी करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले. सदर कार्यवाही संपताच शब्दश: स्क्रिप्ट तयार करण्याची तसेच पडताळणी कार्यवाही मेमरी कार्डची हॅशव्हॅल्यू काढल्यानंतर जप्ती करण्याची तजवीज ठेवली आहे.

पंच क्र. 1 व तक्रारदाराने सांगितलेल्या हकीकत व तसेच तक्रारदार व गैरअर्जदारांचे ऐकीव संभाषणावरून गै.अ. श्री कोमल घुगलोत, वनक्षेत्र सहायक व श्री संदीप पारवे, वनरक्षक यांनी तक्रारदाराचे वाहनावर केलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय भद्रावती येथे पाठविण्याचे कामाकरीता 20,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे आमचे व दोन्ही पंचाचे स्पष्ट मत झाले. त्यावरून आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह गैरअर्जदारांकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला. त्यांनतर सापळा कार्यवाही संबंधाने तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना सुचना देण्यात आल्यात तसेच स्टाफ यांना आपापल्या भुमिकेबाबत माहिती देण्यात आली. तक्रारदार यांची पंच क्र. 1 यांचे हस्ते सापळा कार्यवाही पुर्वी अंगझडती घेवुन हस्तलिखीत अंगझडती तयार करण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाच रक्कमेच्या 500 रू. दराच्या 20 चलनी नोटा व 20 लहान मुलांचे खेळण्यातील नक्कली नोटा असे 20,000/- रुपये आपले उजवे हाताने घेवुन तक्रारदार यांचे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवले त्यांनतर पंच क्र. 2 यांनी बॉटल मधील पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले.त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोशि/प्रदीप ताडाम यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV541238 असे प्रिंट असलेले मेमरी कार्ड मध्ये फाईल क्र. 260727_1216 व्यतीरीक्त इतर कोणतीही फाईल नसल्याबाबत खात्री करून दिली. तसेच पोशि/महेश माहुरपवार यांना लाचरक्कम जप्तीचे व्हिडीओ रेकॉडीग करण्याबाबत सुचना दिले असता त्यांनी कार्यालयीन SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरामध्ये SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5613X4 असे पिं्रट असलेले मेमोरी कार्ड टाकुन त्याचे ताब्यात घेतले.

त्यानंतर पोशि/प्रदीप ताडाम यांनी वरीलप्रमाणे मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हाईस रेकॉर्डरमधील 13/33 वा. रेकॉर्डींग सुरू करून पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 13/35 वा. तक्रारदाराचे हिरो स्पेंडर मो.सा. क्र. MH 34 C 7116 नी रवाना करून त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. 2 व पोनि प्रशांत केदार, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/महेश माहुरपवार, पोशि/अमोल सिडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/सचिन गजभिये, मपोशि मेघा मोहुर्ले असे सोबतच्या शासकीय वाहनाने वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय भद्रावती येथिल समोरील रोडच्या पलीकडे जावून तक्रारदार दिसणार अश्याप्रकारे थांबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार याने वनक्षेत्र सहायक कार्यालयाचे बाहेर येवून गैरअर्जदारांनी लाच स्विकारल्याबाबत आपले डाव्या खिश्यातील रुमाल काढून डाव्या हातातच ठेवून नियोजीत इशारा केला. तेव्हा आम्ही व सोबत असलेले पंच क्र. 2 व स्टॉफ हे घटनास्थळी आलो व तक्रारदारास बाहेर बाजुला

थांबून राहण्याबाबत इशारा करून गैरअर्जदार यांना आमचा परिचय देवून ते बसून असलेल्या खुर्चीवरच बसून राहण्याबाबत सुचना दिल्याने ते काही कृती न करता खुर्चीवर बसून राहीले, त्यांनतर आम्ही, पंच क्र. 01 यांना लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी खुर्चीवरील इसमाकडे बोट दाखवून याने गै.अ. पारवे यांचे सांगणेवरून तक्रारदाराकडून लाच रक्कम स्विकारून आपले गळद हिरव्या रंगाच्या लोअर पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यात ठेवले असल्याचे सांगितले. त्यांनतर पोशि/प्रदीप ताडाम यांचे हस्ते तक्रारदाराचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढून पंच क्र. 1 यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 14/04 वा बंद करण्यात आले.

आम्ही गैरअर्जदारांना सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगून त्यांचे संपूर्ण नाव, पत्ता इ. माहिती विचारली असता त्यांनी अनुक्रमे आपली नावे 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वय 42 वर्षे, पद-वनक्षेत्र सहायक, वनक्षेत्र कार्यालय, भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपूर (आलोसे, वर्ग-3) रा. सरकार नगर, अग्रवाल कोचींग क्लासेस समोर चंद्रपूर 2) संदीप पुंडलिक पारवे वय 39 वर्षे, पद-वनरक्षक, वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती ता.भद्रावती जि. चंद्रपूर (आलोसे, वर्ग-3) रा. धांडे हॉस्पीटल जवळ, तुकूम चंद्रपूर, 3) श्री. ललीत दिलीप नागपूरे वय 19 वर्षे धंदा मजूरी रा. झिंगुजी वार्ड, भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपूर (खाजगी इसम) असे सांगितले.

त्यानंतर वनक्षेत्र सहायक कार्यालयाचे रूममधील सर्व लाईट बंद करून प्रकाशाची तिव्रता कमी झालेवर आमचे सुचनेवरून पोशि/अमोल सिडाम यांनी आम्हा सर्वाचे हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता कोणाचाही हाताला निळसर रंगाची चकाकी दिसून येत नसल्याची गैरअर्जदारांची खात्री करून देवून ललीत नागपूरे (खाजगी इसम) याने त्याचे लोअर पॅन्टचे खिश्यात ठेवलेली रक्कम काढण्यास सांगून ते अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता नोटांना निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने आमचे व दोन्ही पंचाची लाच रक्कम असल्याची खात्री झाली. सदर नोटा पंच क्र. 2 यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यांनतर ललीत नागपूरे (खाजगी इसम) यांनी लाच रक्कम तक्रारदाराकडून स्विकारल्याने त्याचे दोन्ही हात व त्याने परिधान केलेल्या लोअर पॅन्टची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता त्याचे उजव्या हाताचे बोटाचे टोकाला व लोअर पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिश्याला निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच तक्रारदाराचे दोन्ही हात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे संपुर्ण बोटांना निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

गै.अ. ललीत नागपूरे (खाजगी इसम) यांचे ताब्यातून मिळालेल्या लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचले व पंच क्र. 1 यांनी पंचनामा क्र. 1 मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता 20,000/-रूपये (ज्यात 500/- रू दरांच्या 20 चलनी नोटा 10,000/- रू व लहान मुलांचे खेळण्यातील नक्कली 500 चे 20 नोटा 10,000/- रू) नोटाच्या क्रमांकाशी जुळुन आले. नमुद लाच रक्कम लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिलबंद केल्यानंतर लाच रक्कमेचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंच व गै.अ. ललीत नागपूरे (खाजगी इसम) यांनी सहया केल्यात. त्यांनतर 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वनक्षेत्र सहायक, 2) श्री. संदीप पुंडलिक पारवे, वनरक्षक, 3) श्री. ललीत दिलीप नागपूरे (खाजगी इसम) यांची अंगझडती घेवून अंगझडतीत मिळुन आलेला वस्तुची वेगवेगळी यादी तयार करण्यात आली. अंगझडतीत मिळुन आलेले साहित्य व रोख रक्कम आरोपींना वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर आम्ही, दोन्ही पंच आणि आरोपींनी स्वाक्षरी केलेली आहे. अंगझडतीत मिळालेला आरोपींचा मोबाईल आम्ही तपासकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्याची तजवीज ठेवली. सदर बाबतची व्हिडीओ रेकॉडीग करण्यात आली.

त्यांनतर तक्रारदाराची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवून मिळालेले साहीत्य व रोख रक्कमेच्या नोंदी घेतल्यानंतर मिळालेले साहीत्य परत करण्यात आले. तक्रारदार दोन्ही पंच व आम्ही अंगझडती यादीवर स्वाक्षरी केली.त्यांनतर गैरअर्जदारांना तक्रारदाराचे तक्रारीसंबधी कागदपत्राबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे कार्यालयात तक्रारदाराचे ट्रक्टर ट्रालीवर अवैध्यरित्या रेती भरून वाहतुक केलेबाबत केलेल्या कार्यवाहीचा वन गुन्हा प्रतिवृत्त मुळ प्रत वनपरिक्षेत्र कायालियात पाठविले असून त्या प्रतीची छायांकीत प्रत आमचेसमक्ष हजर केल्याने ते गै.अ. श्री. पारवे यांचेकडून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली.

सदरचे घटनास्थळ हे वनक्षेत्र सहायक कार्यालय, वनपरिक्षेत्र कार्यालय परिसर भद्रावती जि.चंद्रपूर येथिल आहे. त्यानंतर आम्ही पोशि/राकेश जांभुळकर यांना घटनास्थळाचा कच्चा नकाशा काढण्याबाबत सुचना देवून कार्यवाहीदरम्यान कोण कुठे होते त्याबाबत सविस्तर सागितले असता त्यांनी सदर घटनास्थळाचा कच्चा नकाशा तयार केला. त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

यानंतर आम्ही, पंच क्र. 1 युवराज जिवन बिरीया यांना सापळा कार्यवाहीवेळी तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात लाच देवाण घेवाण झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, ''तक्रारदार यांचेसह वनक्षेत्र

सहायक कार्यालय भद्रावती येथे गेलो तेव्हा गै.अ. पारवे हे कक्षाचे बाहेरील परिसरात दिसून आल्याने आम्ही त्यांचेजवळ गेलो तेव्हा तक्रारदाराने गै.अ. पारवे यांचेशी बोलणी करून त्यांना ''नसेल बनवला माझा पी.आर. तर करून टाका'' असे म्हटले असता गै.अ. पारवे यांनी ''नाही नाही, आणला का'' असे म्हणुन विचारणा केली तर तक्रारदाराने ''हो'' असे म्हटल्यावर गै.अ. पारवे यांनी तिथे आलेल्या अंगात टिशर्ट व लोअर घातलेल्या इसमाकडे पैसे देण्यास सांगितल्याने तक्रारदाराने त्याचे शर्टाच्या डाव्या खिश्यातील लाच रक्कम उजव्या हातानी काढून त्या इसमाकडे दिल्याने त्याने लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन त्याने घातलेल्या लोअरच्या समोरील उजव्या खिश्यात ठेवले. त्यांनतर तक्रारदाराने नियोजीत इशारा करताच आपण त्याठिकाणी आले'' असे सांगितले. त्यावरुन तक्रारदाराने पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. सदर सापळा कार्यवाहीचे संभाषणाची शब्दश: स्क्रिप्ट तयार करण्याची तसेच पडताळणी/सापळा कार्यवाही मेमरी कार्डची हॅशव्हॅल्यू काढल्यानंतर जप्ती करण्याची तजवीज ठेवली आहे.

त्यांनतर गैरअर्जदार 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत व 2) श्री. संदीप पुंडलिक पारवे यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. किरण धानकुटे, वनपरिक्षेत्र अधिकारी हे घटनास्थळाचे बाजुलाच लागून असलेल्या त्यांचे कार्यालयात हजर असल्याने त्यांना गैरअर्जदारांना ताब्यात घेतल्याची माहीती देण्यात आली. सदरचे ठिकाणी लोकांची गर्दी होत असल्याने कार्यवाहीमध्ये बाधा येवू नये याकरीता सुरक्षा व सोयीच्या दृष्टीने ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे जाण्याचे ठरवून त्याठिकाणी 15/30 वा. पोहचलो.

त्यांनतर आमचे सुचनेनुसार पडताळणी/सापळा कार्यवाही दरम्यानचे व्हाईस रेकॉर्डर पोशि/प्रदीप ताडाम यांनी संगणकाला कनेक्ट केले असता मेमोरी कार्डमध्ये FOLDER 01 मध्ये 260727_1216 या नावाची फाईल व्यतिरीक्त 260727_1333 या नावाची फाईल दिसून आली. सदर फाईल कॉपी केल्यानंतर आम्ही दोन्ही पंच, तक्रारदार यांचेसमक्ष व्हॉईस फाईल फॉरवर्ड करुन ऐकली. यानंतर आम्ही, मपोशि/मेघा मोडुर्ले यांचे हस्ते पडताळणी कार्यवाही व पोशि/सचिन गजभिये यांचे हस्ते सापळा कार्यवाहीवेळी तक्रारदार व गैरअर्जदारांचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत संभाषणाचे संगणकावर शब्दश: स्क्रिप्ट तयार करण्यात आली,

त्यांनतर पडताळणी/सापळा कार्यवाहीचे मेमरीकार्ड मधील रेकॉर्ड व्हाईस फाईल क्र. 260727_1216 व 260727_1333 याची शासकीय संगणकातील Sevenza Hash Calculator या सॉफ्टवेअरव्दारे हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढल्यानंतर त्या हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्रावर दोन्ही पंचानी व पोशि/प्रदीप ताडाम यांनी समक्ष म्हणून सहया केल्या आहेत. सदर पडताळणी/सापळा कार्यवाहीचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV541238 असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करुन एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवून त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिलबंद केले.

तसेच आमचे सुचनेवरुन पोशि/महेश माहुरपवार यांनी सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. ललीत नागपूरे (खाजगी इसम) यांचेकडून लाच रक्कम जप्तीची व गैरअर्जदारांची अंगझडती कार्यवाहीचे चित्रीकरणाचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5613X4 असे पिं्रट असलेले मेमोरी कार्ड SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरा लॅपटॉपला कनेक्ट केले असता MP-ROOT/100ANV01 या मध्ये MAH00001 व MAH00002 या नावाच्या व्हिडीओ फाईल दिसुन आल्या. त्यां फाईलचे Sevenza Hash Calculator सहायाने हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढली. त्यावर दोन्ही पंचानी व पोशि/महेश माहुरपवार यांनी समक्ष म्हणून सही केल्यानंतर कागदपत्रात समाविष्ट केली. सदर फाईल्स असलेले सदरचे मेमरी कार्ड एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवले. सदर सापळा व्हिडीओ कार्यवाहीचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5613X4 असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करुन एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवून त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिलबंद केले.

त्यानंतर 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वनक्षेत्र सहायक, 2) श्री. संदीप पुंडलिक पारवे, वनरक्षक, 3) श्री. ललीत दिलीप नागपूरे (खाजगी इसम) यांना झालेल्या लाचेच्या सापळा कार्यवाहीबाबत त्यांचे काय म्हणणे आहे? याबाबत लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले व कोरे कागद आणि पेन त्यांना उपलब्ध करुन दिले. त्यावरुन त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर दोन्ही पंचानी स्वाक्षऱ्या केल्या व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.

त्यांनतर गै.अ. 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत यांचा विवो कंपनीचा, 2) श्री. संदीप पुंडलिक पारवे यांचा सॅमसंग कंपनीचा व 3) श्री. ललीत दिलीप नागपूरे यांचा सॅमसंग कंपनीचा ताब्यात घेण्यात आलेल्या मोबाईलचे वेगवेगळे पाहणी पंचनामा तयार करुन जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गैरअर्जदारांनी सहया केल्यात. तसेच ललीत दिलीप नागपूरे (खाजगी इसम) यांनी घटनेवेळी परिधान केलेला गळद हिरव्या रंगाचा ज्याचे समोरील दोन्ही बाजुस खिसे असलेला लोअर पॅन्ट पुरावेकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात

आले. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गै.अ. ललीत नागपूरे यांनी सहया केल्यात. तरी यातील आलोसे क्र. 1) श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वय 42 वर्षे, पद-वनक्षेत्र सहायक, (वर्ग-3), आलोसे क्र. 2) संदीप पुंडलिक पारवे वय 39 वर्षे, पद-वनरक्षक (वर्ग-3), दोन्ही वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती यांनी तक्रारदाराचे टॅक्टर ट्रालीवर अवैध्यरित्या रेती भरून वाहतुक केल्याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे पाठविण्याचे कामाकरीता 20,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून आरोपी क्र. 3) श्री. ललीत दिलीप नागपूरे वय 19 वर्षे धंदा मजूरी रा. झिंगुजी वार्ड, भद्रावती (खाजगी इसम) यांचे मार्फतीने स्विकारल्याने आरोपीतांविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, (सुधारणा 2018) कलम 7, 7 अ,12 अन्वये कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.

(

अनिल जिड्डावार )

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Virendra Devidas Kedare
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402VD
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Yogeshwar Vithoba
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
पो.स्टे.

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) **Burn Mark** (भाजल्याच्य ा खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)